॥ श्री ॥

आपली भूमी.. आपला आवाज...

# वीरभूमी

संपादक : महादेव दळे

■ अहिल्यानगर ■ सोमवार, दि. २५ मे २०२६ ■ वर्ष ७ वे ■ अंक २ रा ■ पाने ४ ■ किंमत ३ रुपये ■ RNI No. MAHMAR / 2012 / 47715 9420802145 www.veerbhuminews.com


✻ सुविचार ✻

सत्याला कोणी
हरवू शकत नाही

## फोडणी

राजू घुगरे,
शेवगाव, मो. ९४२२८५६१६४

### दरवाढ

इंधनाचे दर आता
दिवसाला वाढत आहे
वड्याचे तेल जणू ते
वांग्यावरच काढत आहे

महागाई आली आहे
भलतीच आता भरात
सहनशील अर्थव्यवस्था
कोलमडून पडली घरात

## SPOT NEWS

### जगभरात इबोलाचा धोका

● **जीनिव्हा –** डब्ल्यूएचओने काँगोचे लोकशाही प्रजासत्ताक आणि युगांडातील उद्रेकाची गंभीर दखल घेत इबोला आजाराला 'आंतरराष्ट्रीय चिंतेची सार्वजनिक आरोग्य आणीबाणी' म्हणून अधिकृतपणे घोषित केले आहे. आरोग्य संघटनेच्या या निर्णयामुळे आंतरराष्ट्रीय स्तरावर विविध प्रतिक्रिया उमटल्या असून, भारत सरकारनेही प्रवासाबाबत खबरदारीची नियमावली (ट्रॅव्हल ॲडव्हायझरी) जारी केली आहे. हा उद्रेक इबोला विषाणूच्या दुर्मिळ 'बुंदिबुग्यो' स्ट्रेनमुळे झाला आहे, ज्यावर सध्या कोणतेही मान्यताप्राप्त लस किंवा उपचार उपलब्ध नाहीत. काँगोच्या तीन प्रांतांमध्ये ८६७ संशयित रुग्णांपैकी २०४ मृत्यूंची नोंद झाली आहे. २०१४ ते २०१६ मधील पश्चिम आफ्रिकेतील साथीनंतरचा हा इतिहासातील दुसरा सर्वात मोठा इबोला उद्रेक ठरला आहे. या उद्रेकाच्या पार्श्वभूमीवर, काँगो आणि युगांडाच्या सीमांना लागून असलेल्या दक्षिण सुदानसह इतर शेजारील देशांमध्ये संसर्ग पसरण्याचा धोका सर्वाधिक असल्याचे सांगण्यात येत आहे.

# हँडग्रेनेडचा स्फोटात ४ जण जखमी

## अहिल्यानगर पोलीस मुख्यालयात प्रशिक्षणादरम्यान घडली घटना

● **अहिल्यानगर । वीरभूमी–**
येथील पोलीस मुख्यालयाच्या मैदानावर सुरू असलेल्या प्रशिक्षणादरम्यान अत्यंत धक्कादायक दुर्घटना घडली आहे. मॉक ड्रिल दरम्यान हाताळणीचे प्रशिक्षण दिले जात असताना एका हँडग्रेनेडचा हातातच भीषण स्फोट झाला. या दुर्घटनेत चार प्रशिक्षणार्थी पोलीस कर्मचारी गंभीर जखमी झाले आहेत.





आज सकाळी १० वाजेच्या सुमारास ही घटना घडली. यामुळे पोलीस दलात प्रचंड खळबळ उडाली आहे. मिळालेल्या माहितीनुसार, पोलीस कर्मचाऱ्यांना हँडग्रेनेड कसा हाताळावा याबाबत प्रात्यक्षिकासह माहिती दिली जात होती. त्याचवेळी अचानक हँडग्रेनेडचा हातातच स्फोट झाला.

या दुर्दैवी घटनेत शिवराज पवार, शुभम कावरे, गणेश मढे आणि योगेश सोळुंके हे चार प्रशिक्षणार्थी पोलीस कर्मचारी जखमी झाले आहेत. यापैकी दोघांच्या हाताच्या बोटांच्या चिंधड्या उडाल्या आहेत. तर इतर दोन कर्मचारी किरकोळ जखमी झाले आहेत.

घटनेनंतर संपूर्ण पोलीस मुख्यालयात एकच पळापळ आणि गोंधळ उडाला. वरिष्ठ पोलीस अधिकाऱ्यांनी तात्काळ घटनास्थळी धाव घेतली. सर्व जखमी कर्मचाऱ्यांना तातडीने जवळच्या खाजगी रुग्णालयात दाखल करण्यात आले आहे. तज्ज्ञ डॉक्टरांच्या देखरेखीखाली त्यांच्यावर उपचार सुरू आहेत.

राखीव पोलीस निरीक्षक उमेश परदेशी यांनी सांगितले की, हा स्फोट स्मोक हँडग्रेनेड फुटल्यामुळे झाला आहे. जमाव पांगवण्यासाठी वापरल्या जाणाऱ्या या ग्रेनेडची पिन काढल्यानंतर संबंधित जवानांकडून लिव्हर सुटल्याने हा अपघाती स्फोट झाला. या घटनेमुळे पोलीस वर्तुळातून मोठी हळहळ व्यक्त केली जात आहे.

# राज्यात मान्सूनपूर्व जोरदार पाऊस

● **मुंबई । वीरभूमी–**
गेल्या काही दिवसांपासून अस उकाड्याने हैराण झालेल्या राज्यातील नागरिकांना अखेर दिलासा मिळाला आहे. मुंबई, कोकण, सोलापूरसह राज्याच्या विविध भागांत मान्सूनपूर्व पावसाने जोरदार हजेरी लावली. अरबी समुद्रात नैऋत्य मोसमी वाऱ्यांच्या वाटचालीसाठी पोषक वातावरण निर्माण झाले आहे. त्यामुळे पुढील ३ दिवसांत मान्सून केरळमध्ये दाखल होण्याचे संकेत आहेत. मात्र या पावसासोबत आलेल्या तीव्र वादळी वाऱ्यामुळे उत्तर पुणे, बीड आणि छत्रपती संभाजीनगरमध्ये शेतीचे आणि मालमत्तेचे मोठे नुकसान झाले आहे.

मुंबई शहर आणि उपनगरांमध्ये आज सकाळपासूनच ढगाळ वातावरण पाहायला मिळत आहे. त्यातच आता काही ठिकाणी मान्सूनपूर्व पावसाच्या सरी कोसळताना दिसत आहेत. मुंबईतील दादर, मुलुंड, बांद्रा आणि सांताक्रूझ परिसरात रिमझिम पावसाने हजेरी लावली. तसेच मीरा–भाईंदर शहरातही सकाळी अचानक अवकाळी पावसाच्या जोरदार सरी कोसळल्या. त्यामुळे तापमानात मोठी घट झाली आहे. तसेच गेल्या काही दिवसांच्या प्रचंड उकाड्यापासून नागरिकांना तात्काळ आराम मिळाला आहे.

रत्नागिरी जिल्ह्यात सकाळपासूनच मान्सूनपूर्व पावसाचा वेग वाढला आहे. राजापूर, लांजा, संगमेश्वर या भागात दमदार सरी बरसल्या. लांजा तालुक्यातील सापुचेतळे आणि खानवली भागात ढगांच्या गडगडाटासह पावसाने जोरदार बॅटिंग केली.

# यवतमाळमध्ये उन्हाचा कहर

● **यवतमाळ । वीरभूमी–**
राज्यात सध्या तापमानाचा पारा ४० ते ४५ अंशांपर्यंत पोहोचल्याने नागरिकांना तीव्र उकाड्याचा मोठा त्रास सहन करावा लागत आहे. या वाढत्या तापमानाच्या पार्श्वभूमीवर यवतमाळ जिल्ह्यातून एक अत्यंत धक्कादायक वृत्त समोर आले असून, जिल्ह्यात सुरू असलेल्या प्रचंड उष्णतेने गत ४८ तासांत ८ जणांचा बळी गेल्याचे वृत्त आहे.

मिळालेल्या माहितीनुसार, या सर्व मृत्यूंचे नेमके कारण शवविच्छेदन अहवाल प्राप्त झाल्यानंतरच स्पष्ट होणार आहे. आतापर्यंत समोर आलेल्या माहितीनुसार, दिग्रसमध्ये अवघ्या चोवीस तासांत तिघांचा मृत्यू झाला आहे. याव्यतिरिक्त यवतमाळच्या चापमनवाडी आणि भोसा मार्गावर दोघांचा, पुसदमध्ये दोघांचा, तर बाभूळगाव येथे एकाचा आकस्मिक मृत्यू झाला आहे. या आठ मृत व्यक्तींपैकी चौघांची ओळख पटली असून, उर्वरित चार जण अद्याप अज्ञात आहेत.

यातील काही घटना अत्यंत दुर्दैवी आहेत. बाभूळगावच्या गवंडी ते किन्ही रस्त्यावरील पुलाखाली मारोतराव कावे यांचा मृतदेह आढळून आला. तसेच, पुसद येथील हनुमान वॉर्डात अन्नपूर्णा मुळे या वृद्ध महिलेला भर उन्हात कुलरमध्ये पाणी भरल्यानंतर अस्वस्थ वाटू लागले आणि रुग्णालयात दाखल करण्यापूर्वीच त्यांचा मृत्यू झाला. याशिवाय, पुसद नगरपरिषदेच्या इंदिरानगर भागातील डम्पिंग यार्डसमोर सुभाष राठोड यांचा मृतदेह आढळल्याने मोठी खळबळ उडाली आहे.

# व्हाईट हाऊसबाहेर अंदाधुंद गोळीबार

● **वॉशिंग्टन –**
अमेरिकेचे राष्ट्राध्यक्ष डोनाल्ड ट्रम्प यांच्या सुरक्षेत पुन्हा एकदा मोठी त्रुटी निर्माण झाल्याचे समोर आले आहे. शनिवारी सायंकाळी व्हाईट हाऊसजवळ अज्ञात हल्लेखोराने अंदाधुंद गोळीबार केला. ही घटना घडली तेव्हा डोनाल्ड ट्रम्प व्हाईस हाऊसमध्ये उपस्थित होते. व्हाईट हाऊस किंवा डोनाल्ड ट्रम्प उपस्थित असलेल्या परिसरात गोळीबार होण्याची महिन्याभरातील ही तिसरी घटना असून यामुळे अमेरिकेत एकच खळबळ उडाली आहे.

दरम्यान, सिक्रेट सर्व्हिसने प्रत्युत्तरादाखल केलेल्या गोळीबारात हल्लेखोर ठार झाला आहे. नासिर बेस्ट (वय २१) असे हल्लेखओराचे नाव असल्याची माहिती एका वरिष्ठ पोलिस अधिका–यांनी दिली आहे. सिक्रेट सर्व्हिसने सोशल मीडिया प्लॅटफॉर्म एक्सवर दिलेल्या प्राथमिक माहितीनुसार, शनिवारी संध्याकाळी ६ वाजण्याच्या सुमारास १७ व्या स्ट्रीट आणि पेनसिल्व्हेनिया एव्हेन्यूच्या परिसरात एक संशयास्पद तरुण आला. त्याने अचानक आपल्या बॅगमधून बंदूक काढली आणि गोळीबार करण्यास सुरुवात केली. हल्लेखोराने एकामागोमाग एक ३० राऊंड फायर केले. आणीबाणीची परिस्थिती निर्माण झाल्याने सिक्रेट सर्व्हिसने प्रत्युत्तरादाखल केलेल्या गोळीबारात हल्लेखोर गंभीर जखमी झाला. त्याला तातडीने जवळच्या रुग्णालयात नेण्यात आले, मात्र उपचारांदरम्यान त्याचा मृत्यू झाला.

गोळीबाराचा आवाज ऐकताच व्हाईट हाऊस परिसरात काम करणाऱ्या पत्रकारांमध्ये प्रचंड घबराट पसरली. त्यांना सुरक्षेच्या कारणास्तव तातडीने प्रेस ब्रीफिंग रूममध्ये आश्रय घेण्यास सांगण्यात आले. 'एबीसी न्यूज'च्या वरिष्ठ व्हाईट हाऊस वार्ताहर सेलिना वांग या घटनेच्या वेळी तिथेच उपस्थित होत्या. त्या एका बातमीचे रेकॉर्डिंग करत असतानाच अचानक गोळ्यांचा प्रचंड आवाज आला. त्यांनी प्रसंगावधान राखत खाली वाकून स्वत:चा बचाव केला. त्यांच्या मोबाईलमध्ये हा सगळा थरार कैद झाला असून हा व्हीडीओ सोशल मीडियावर प्रचंड व्हायरल झाला आहे.

बाहेर गोळीबाराचा थरार सुरू असताना डोनाल्ड ट्रम्प हे व्हाईट हाऊसमध्ये उपस्थित होते. परंतु ते सुरक्षित असल्याचे कळते.


आशीर्वाद

खंबीर साथ




**तरुण नेतृत्वाचा प्रेरणादायी प्रवास**

लोणी व्यंकनाथच्या विकासाचा ध्यास घेणारे युवा नेते **मा. मितेश (नितेश) बाळासाहेब नाहाटा** यांना २७ व्या वाढदिवसानिमित्त हार्दिक शुभेच्छा !

२५ मे रोजी युवा नेतृत्व, सामाजिक बांधिलकी व विकासाची दूरदृष्टी लाभलेले लोणी व्यंकनाथ गावचे उपसरपंच **मा. मितेश बाळासाहेब नाहाटा** यांचा २७ वा वाढदिवस उत्साहात साजरा होत आहे. अत्यंत कमी वयात समाजकारण, राजकारण व उद्योग क्षेत्रात आपली स्वतंत्र ओळख निर्माण करणारे मितेश नाहाटा हे श्रीगोंदा तालुक्यातील तरुणांसाठी प्रेरणास्थान ठरले आहेत. वयाच्या अवघ्या २१ व्या वर्षी लोणी व्यंकनाथ गावच्या उपसरपंचपदी निवड होणे, ही त्यांच्या नेतृत्वक्षमतेची पावतीच मानली जाते. त्यांची आई सौ. मनिषा बाळासाहेब नाहाटा या लोणी व्यंकनाथ गावच्या विद्यमान सरपंच म्हणून कार्यरत असून गावाच्या विकासासाठी नाहाटा कुटुंब सातत्याने कार्यरत आहे.

राज्याचे माजी उपमुख्यमंत्री स्व. अजितदादा पवार यांनी **मितेश नाहाटा** यांच्या कार्यक्षमतेची दखल घेत त्यांची जैन अल्पसंख्याक महामंडळाच्या उपाध्यक्षपदी नियुक्ती केली. तसेच साखर व्यापार क्षेत्रात आंतरराष्ट्रीय बाजारपेठेत पुढे जाण्यासाठी त्यांना मोलाचे मार्गदर्शन व सहकार्य लाभले. त्यांच्या वडिलांना मा. बाळासाहेब नाहाटा यांनाही राज्य बाजार समितीच्या अध्यक्षपदाची जबाबदारी देऊन नाहाटा कुटुंबाच्या कार्याचा गौरव करण्यात आला.

कोविडसारख्या भीषण संकटाच्या काळात लोणी व्यंकनाथ येथे कोविड सेंटर उभारून हजारो रुग्णांना उपचार, ऑक्सिजन, औषधे व जेवणाची मोफत सुविधा उपलब्ध करून देत **मितेश नाहाटा** यांनी मानवतेचे दर्शन घडविले. त्यांच्या या सेवाभावी कार्यामुळे असंख्य कुटुंबांना आधार मिळाला व हजारो रुग्णांचे आशीर्वाद त्यांना लाभले.

सामाजिक, शैक्षणिक, आरोग्य व युवकांच्या विविध उपक्रमांमध्ये सक्रिय सहभाग घेत त्यांनी लोणी व्यंकनाथ गावाला राज्याच्या नकाशावर विशेष ओळख मिळवून दिली आहे. धाडसी निर्णयक्षमता, समाजाप्रती असलेली तळमळ आणि सर्वसामान्यांशी असलेली आत्मीयता यामुळे अल्पावधीतच त्यांनी श्रीगोंदा तालुक्यात मजबूत सामाजिक प्रतिमा निर्माण केली आहे.

त्यांच्या वाढदिवसानिमित्त त्यांना निरोगी, दीर्घायुषी व यशस्वी भवितव्यासाठी मनःपूर्वक शुभेच्छा! वाढदिवसाभिनंदन!

विजय उंडे, श्रीगोंदा ता. प्रतिनिधी मो. ९४२३७९३०७९



सामाजिक बांधिलकीचे नवे पर्व

**(अध्यक्ष : मितेषकुमार बाळासाहेब नाहाटा)**

**जागर युवा प्रतिष्ठान** या सामाजिक संघटनेचे उद्घाटन

सोमवार दि. २५/०५/२०२६ रोजी सायं ७:०० वा.
स्थळ : बाळासाहेब नाहटा यांचे जनसंपर्क कार्यालय

✻ उद्घाटक ✻
**मा. श्री. टिळक भोस**
जिल्हा अध्यक्ष, स्वराज्य जनजागृती परिषद

✻ प्रमुख उपस्थिती ✻
**श्री. ऋषिकेश शेलार**
लोकनियुक्त सरपंच ग्रामपंचायत बेलवंडी

१) गावातील हनुमान महाराज मंदिर बांधकामासाठी नाहाटा परिवाराच्या वतीने देणगी रक्कम रु २,२१,०००
२) ५००० लिटरचा पाण्याचा टँकर लोकार्पण (मोफत पाणी पुरवठा)
३) स्व. खंडू आप्पासाहेब काकडे यांच्या परिवारातील ३ मुलांना शिक्षणासाठी ७५००० कुटूंबीयांना प्रदान करणार
४) कु. वैष्णवी दत्तात्रय गोरखे हिच्या ११ वी पासून पुढील महाविद्यालयीन शिक्षणाचे जबाबदारी
५) श्री. मारुती दत्तात्रय लबडे यांच्या हाताची शस्त्रक्रिया
६) मोफत चष्मा शिबीर (३०० लोकांना उत्तम प्रतीचे चष्मे प्रदान करणार) (वेळ स १० ते ५)

तरी वरील सर्व कर्यक्रमास आपण सर्वांनी उपस्थित राहावे हि विनंती..!

✻ मार्गदर्शक मंडळ ✻
श्री. ज्ञानदेव (माऊली) मगर. श्री. बाळासाहेब (आण्णा) थोरात,
श्री.गणेश भाऊसाहेब काकडे, श्री.पंढरीनाथ बाप्पु खंडागळे, श्री. शिवाजीराव जाधव

**जागर युवा प्रतिष्ठान,**
**लोणी व्यंकनाथ**
श्री. मिथुन रखमाजी नगरे,
श्री. अमोल शिवाजी क्षीरसागर,
श्री. राहुल दशरथ गोरखे,
श्री. दिगंबर रमेश साळवे,
इम्तियाज लियाकत तांबोळी,
श्री. अनिल साहेबराव खेडेकर,
जावेद आबास्स शेख,
श्री. तुषार मानसिंग काकडे,
श्री. विनोद लालासाहेब काकडे,
श्री. ओंकार अंकुश खेडकर,
श्री. नवनाथ प्रकाश खेतमाळीस,
श्री. स्वप्नील सुरेश लाटे,
श्री. निरंजन संतोष ओव्हळ,
श्री. निलेश लालासाहेब आमले

✻ आपला विश्वासू ✻
**मा. श्री. मितेषकुमार बाळासाहेब नाहाटा**
अध्यक्ष जागर युवा प्रतिष्ठान, श्रीगोंदा

SPOT NEWS

## अहिल्यानगर जिल्हा महसूल प्रशासनात बदल्यांची प्रक्रिया

**● अहिल्यानगर । वीरभूमी –**

जिल्हा प्रशासनात तीन वर्षांचा कार्यकाळ पूर्ण झालेल्या कर्मचार्यांच्या बदल्यांची प्रक्रिया सुरू झाली आहे. जनगणनेमध्ये जबाबदारी असलेल्या कर्मचार्यांना या बदली प्रक्रियेतून वगळण्यात आले आहे. त्यामुळे १५९ कर्मचारीच बदलीस पात्र ठरत आहेत. प्रशासकीय, विनंती बदल्या दरवर्षी केल्या जातात. यावर्षी जनगणनेची प्रक्रिया सुरू आहे. या प्रक्रियेतील कर्मचार्यांना बदली प्रक्रियेतून वगळण्यात आले आहे.महसूल सहायक पदावरील ६०, अव्वल कारकून ५४, तलाठी १० तर मंडलाधिकारी ३५ बदलीस पात्र ठरत आहेत. जे कर्मचारी बदलीस पात्र आहेत. त्यांना विकल्प मागविण्यात आले आहेत. सर्व बदल्या या पारदर्शी आणि ऑनलाईन पद्धतीने होणार आहेत. दिव्यांग कर्मचार्यांना प्रथम प्राधान्य दिले जाणार आहे. शासकीय कर्मचार्यांचे पाल्य गंभीर आजारी असणार्या दुसर्या क्रमांकावर, त्यानंतर कर्मचारी स्वत: गंभीर आजारी असल्यास त्यास प्राधान्य दिले जाणार आहे. विधवा-परितक्त्या चौथ्या क्रमांकावर, पती-पत्नी एकत्रिकरण, शासकीय कर्मचार्यांच्या पाल्यांची शस्त्रक्रिया असणारे सहाव्या तर माजी सैनिक सातव्या क्रमांकावर आहेत. प्रत्येक वर्गवारीला कर्मचार्यांना उपलब्ध जागा ऑनलाईन पद्धतीने दाखविल्या जाणार आहेत. त्यानंतर त्यांने बदलीचे ठिकाण निवडल्यावर पुढील वर्गवारीतील कर्मचार्याला संधी दिली जाणार आहे. या बदल्या या महिनाअखेर होण्याची शक्यता आहे.

## ट्रॅक्टरला धडकून दुचाकीने पेट घेतल्याने दोन तरुणांचा जागीच मृत्यू

**● पाथर्डी । वीरभूमी –**

काळजाचा थरकाप उडवणारी दुर्घटना पाथर्डी तालुक्यात घडली आहे. रस्त्यावरून धावणार्या वाहनांचा अपघात अनेकदा आपण ऐकतो, पण अपघातानंतर अवघ्या काही क्षणांत दुचाकीने पेट घेऊन दोन जिवंत माणसांचा कोळसा व्हावा, अशी हृदयद्रावक घटना टाकळी मानूर परिसरामध्ये घडली आहे. ट्रॅक्टर-ट्रॉली आणि दुचाकीच्या या भीषण धडकेत दोन तरुणांचा होरपळून जागीच मृत्यू झाला असून दोन हसतीखेळती कुटुंबे उध्वस्त झाली आहेत.मिळालेल्या माहितीनुसार, पाथर्डी तालुक्यातील टाकळी मानूर (अंबिकानगर) येथील रहिवासी असलेले इकबाल अत्तार (वय ३२) आणि शफिक शेख (वय ४०) हे दोघे मंगळवारी रात्री पाथर्डीहून आपल्या गावाकडे दुचाकीवरून निघाले होते. रात्री १० वाजेच्या सुमारास बीड जिल्ह्यातील शिरूर तालुक्यातील मानूर येथील दहिफळे वस्ती परिसरात, 'समाधान हॉटेल' समोर त्यांच्या दुचाकीची ट्रॅक्टर-ट्रॉलीशी अत्यंत जोरदार धडक झाली. ही धडक इतकी भीषण होती की, धडकेनंतर दुचाकीच्या पेट्रोल टाकीचा स्फोट होऊन गाडीने अचानक मोठा पेट घेतला. मदतीसाठी धावले नागरिक, पण घात झाला!आगीच्या ज्वालांनी दोन्ही दुचाकीस्वारांना घेरले. रस्त्यावरून जाणार्या व परिसरातील नागरिकांनी प्रचंड खळबळ उडाल्यानंतर तातडीने घटनास्थळी धाव घेतली आणि आग विझवण्याचा शर्थीचे प्रयत्न केले. परंतु, आगीचा वेग इतका थरकाप उडवणारा होता की, मदत मिळेपर्यंत दोन्ही तरुण गंभीररीया भाजले गेले आणि त्यांचा जागीच दुर्दैवी मृत्यू झाला. दोन कुटुंबांवर कोसळला दुःखाचा डोंगरया अपघातातील मृतांची कौटुंबिक पार्श्वभूमी ऐकून संपूर्ण परिसराचे डोळे पाणावले आहेत. मृत इकबाल याच्या कुटुंबावर गेल्या वर्षभरापासून संकटांची मालिका सुरू आहे. वर्षापूर्वी त्याच्या भावाचा अपघातात, तर सहा महिन्यांपूर्वी आईचा हृदयविकाराने मृत्यू झाला होता. आता कुटुंबाचा एकमेव कमावता आधार असलेला इकबालही काळाने हिरावून नेला. त्याच्या पश्चात वृद्ध वडील, पत्नी आणि एक लहान मुलगी आहे. दुसरीकडे, मृत शफिक शेख हा आपल्या आई-वडिलांचा एकुलता एक मुलगा होता. वडिलांच्या पश्चात वृद्ध आई, पत्नी, मुलगा आणि मुलगी अशा संपूर्ण कुटुंबाची जबाबदारी तो एकटाच सांभाळत होता. या भीषण अपघातामुळे दोन्ही गावे आणि दोन्ही कुटुंबांवर शोककळा पसरली असून रस्त्यांवरील असुरक्षित वाहतुकीचा प्रश्न पुन्हा एकदा ऐरणीवर आला आहे.

## केडगाव ब्राह्मण सेवा संघाचे उपाध्यक्ष किरण खुर्जेकर यांचे दुःखद निधन

**● अहिल्यानगर । वीरभूमी –**

केडगाव ब्राह्मण सेवा संघाचे उपाध्यक्ष किरण उर्फ प्रमोद खुर्जेकर यांचे अल्पशा आजाराने दिनांक २४ मे २०२६ निधन झाले. त्यांच्या पश्चात पत्नी, दोन मुली असा परिवार आहे. त्यांच्यावर केडगाव येथील अमरधाम मध्ये अंत्यसंस्कार करण्यात आले. यावेळी विविध क्षेत्रातील प्रतिष्ठित व्यक्ती मोठ्या संख्येने उपस्थित होते. केडगाव ब्राह्मण सेवा संघाच्या स्थापनेपासून म्हणजेच सुमारे २७ ते २८ वर्षापासून संघाच्या सर्व उपक्रमाचे नेतृत्व त्यांनी केले होते, केडगाव ब्राह्मण सेवा संघ दरवर्षी सामुदायिक व्रतबंध आयोजित करत असतो या सामूहिक उपक्रमात श्री खुर्जेकर यांचा मोलाचे सहभाग असायचा. तसेच अंबिकानगर आणि केडगाव परिसरात एक सुसंस्कृत आणि सुस्वाभावी व्यक्तिमत्व म्हणून खुर्जेकर हे परिचित होते.

# संगमनेर तालुक्याच्या विकासाचा नवा अध्याय

### पालकमंत्री राधाकृष्ण विखे पाटील । धांदरफळ खुर्द-मिर्झापूर रस्त्याचे भूमिपूजन

**● संगमनेर । वीरभूमी –**

तालुक्याचा विकास केवळ काही ठराविक भागापुरता मर्यादित न राहता सर्वसामान्य नागरिकांपर्यंत पोहोचविण्यासाठी महायुती सरकार कटिबद्ध आहे. आमदार अमोल खताळ यांच्या माध्यमातून समतोल विकासाला गती मिळत असल्याचे प्रतिपादन पालकमंत्री राधाकृष्ण विखे पाटील यांनी केले. तालुक्यातील धांदरफळ खुर्द ते मिर्झापूर रस्त्याच्या भूमिपूजन कार्यक्रमात ते बोलत होते.

यावेळी धांदरफळ खुर्द येथील महावितरण उपकेंद्राची वाढीव क्षमता कार्यान्वित करण्याचाही शुभारंभपालकमंत्री विखे पाटील आणि आमदार अमोल खताळ यांच्या हस्ते करण्यात आला. विखे पाटील म्हणाले की, संगमनेर तालुक्याचा विकास अनेक वर्षे काही मोजक्या लोकांभोवती केंद्रित राहिला. मात्र, आता चौकटीपलीकडे जाऊन सर्व भागांचा समतोल विकास साधण्याचा प्रयत्न सुरू आहे. विधानसभा निवडणुकीत जनतेने महायुतीवर दाखविलेला विश्वास सार्थ ठरविण्यासाठी सरकार कटिबद्ध आहे. शेतकर्यांसाठी राज्यभरात सौरऊर्जा प्रकल्प उभारण्याचे काम सुरू असल्याचे सांगताना त्यांनी पारनेर तालुक्यातील जवळा येथे १९ मेगावॅट क्षमतेचा प्रकल्प उभारण्यात आल्याची माहिती दिली. संगमनेर तालुक्यातील कहे, तळेगाव आणि पारेगाव खुर्द येथेही सौरऊर्जा प्रकल्प सुरू करण्यात आले असून अन्य ठिकाणी जागा उपलब्ध झाल्यास नवीन प्रकल्प सुरू केले जातील, असे त्यांनी स्पष्ट केले.

या प्रकल्पांमुळे शेतकर्यांना सकाळी सहा ते रात्री नऊ या वेळेत दिवसा अखंडित वीजपुरवठा मिळणार आहे, असेही त्यांनी सांगितले. राज्यात मोठ्या प्रमाणावर औद्योगिक गुंतवणूक होत असून टाटा ग्रुप सारख्या उद्योगसमूहांच्या प्रकल्पांमुळे हजारो युवकांना रोजगाराच्या संधी उपलब्ध होणार असल्याचे विखे पाटील म्हणाले.

मात्र या संधींचा लाभ घेण्यासाठी युवकांनी कौशल्याधारित व रोजगाराभिमुख प्रशिक्षण घेण्याची गरज असल्याचे त्यांनी नमूद केले. महायुतीच्या कार्यकर्त्यांनी केवळ स्थानिक निवडणुकांच्या राजकारणात न अडकता युवकांच्या भविष्याकडे लक्ष द्यावे, असे आवाहनही त्यांनी केले.

यावेळी आमदार अमोल खताळ म्हणाले की, धांदरफळ ते मिर्झापूर रस्त्याची अवस्था अनेक वर्षांपासून अत्यंत खराब होती. लहानपणापासून या रस्त्याची दुरावस्था पाहत आलो, मात्र हा रस्ता पूर्णत्वास नेण्याचे भाग्य लाभेल असे वाटले नव्हते. मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस, उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे, उपमुख्यमंत्री सुनेत्रा पवार, ग्रामविकास मंत्री जयकुमार गोरे आणि पालकमंत्री राधाकृष्ण विखे पाटील यांच्या माध्यमातून या रस्त्यासाठी सुमारे ६ कोटी ३० लाख रुपयांचा निधी मंजूर करण्यात आल्याचे त्यांनी सांगितले. हा रस्ता काँक्रीटीकरण पद्धतीने होणार असून त्याचा दहा वर्षांचा दुरुस्ती कालावधी असणार आहे. हा माझ्या गावाचा रस्ता असल्याने कामाच्या गुणवत्तेबाबत कोणतीही तडजोड सहन केली जाणार नाही, असा इशाराही त्यांनी ठेकेदाराला दिला.

धांदरफळ खुर्द येथील पाच एमव्हीए क्षमतेचा ट्रान्सफॉर्मर वाढवून दहा एमव्हीए करण्यात आला असून त्यासाठी ७० लाख रुपयांचा खर्च करण्यात आला आहे. याचा लाभ धांदरफळ, निमगाव, पेमगिरी, सांगवी, कौठे, गोडसेवाडी आदी गावांना होणार आहे. तसेच जवळे कडलग येथील उपकेंद्राचेही दहा एमव्हीए क्षमतेचे सक्षमीकरण करण्यात आल्याने निमगाव भोजापूर, वडगाव लांडगा आणि चिकणी परिसराला फायदा होणार आहे. गोडसेवाडी येथील रखडलेला सौरऊर्जा प्रकल्प सुरू करण्यासाठी प्रयत्न सुरू असल्याचे सांगताना आमदार खताळ यांनी या भागातील शेतकर्यांना दिवसा पूर्ण दाबाने वीज उपलब्ध करून देण्याचा सरकारचा मानस आहे, असे स्पष्ट केले. धांदरफळ गटासाठी गेल्या दीड वर्षांत मोठ्या निधीतून विविध विकासकामे मंजूर करण्यात आली असून, प्रत्यक्षात कामे सुरू असल्याचे आमदार खताळ यांनी सांगितले.

## मराठी भाषा प्राविण्य परीक्षेत टाकळी मानूर विद्यालयाचा गौरव; विद्यार्थ्यांसह शिक्षकांचा सन्मान



**● पाथर्डी । वीरभूमी –**

मराठी राजभाषा संवर्धन समिती, अहिल्यानगर यांच्या वतीने आयोजित करण्यात आलेल्या राज्यस्तरीय मराठी भाषा प्राविण्य परीक्षेत तालुक्यातील टाकळी मानुर येथील श्री भवानी माता माध्यमिक व उच्च माध्यमिक विद्यालयातील विद्यार्थ्यांनी उल्लेखनीय यश संपादन केले. इयत्ता पाचवी ते सातवीमधील केंद्रस्तरावर गुणानुक्रमे प्रथम पाच क्रमांक मिळविणार्या विद्यार्थ्यांचा नुकताच अहिल्यानगर येथील माऊली सभागृहात मान्यवरांच्या हस्ते गौरवचिन्ह व प्रमाणपत्र देऊन सन्मान करण्यात आला.

या प्रसंगी विद्यालयाचे प्राचार्य देविदास सोनटक्के यांना उपक्रमशील प्राचार्य म्हणून गौरविण्यात आले, तर उपशिक्षक शाम गुंजकर यांचा मराठी विषय मार्गदर्शक शिक्षक म्हणून विशेष सन्मान करण्यात आला.

कार्यक्रमात आदर्श शिक्षक व साहित्यिक संजय कळमकर, महेश डाळिंबकर, आदर्श शिक्षक लहू बोराटे, छत्रपती संभाजीनगर येथील प्रसिद्ध बालसाहित्यिक नारायण खरात, माध्यमिक शिक्षक सोसायटीचे ज्येष्ठ संचालक बाबासाहेब बोडखे, महेंद्र हिंगे आदी मान्यवरांच्या हस्ते विजेत्या विद्यार्थ्यांचा सत्कार करण्यात आला.

राज्यस्तरीय या परीक्षेसाठी अहिल्यानगर जिल्ह्यातून सुमारे दहा हजार विद्यार्थी सहभागी झाले होते. विद्यार्थ्यांच्या यशामुळे विद्यालयासह परिसरात आनंदाचे वातावरण निर्माण झाले आहे. या भव्य कार्यक्रमाचे नियोजन, आयोजन व संकल्पना अमोल क्षीरसागर व सौ. क्षीरसागर मॅडम यांनी केली होती. त्यांच्या नेतृत्वाखाली संपूर्ण टीमने अत्यंत शिस्तबद्ध व दिमाखदार पद्धतीने कार्यक्रम यशस्वीरीत्या पार पाडला.

## वादळाने झालेल्या नुकसानीची करत आमदार आशुतोष काळेंनी प्रशासनाकडून घेतला पंचनाम्याचा आढावा

**● कोपरगाव । वीरभूमी –**



मतदार संघात शुक्रवार (दि.२२) रोजी सायंकाळी सातच्या सुमारास अचानकपणे विजांच्या कडकडाटासह मुसळधार पाऊस आणि वादळी वार्यामुळे अनेक गावांमध्ये मोठ्या प्रमाणात नागरीकांचे नुकसान झाले आहे. अनेक घरांचे पत्रे उडाले, झाडे कोसळली, फळबागांसह पिकांचे नुकसान झाले तसेच काही ठिकाणी वीज वाहिन्यांवर झाडांच्या फांद्या पडल्यामुळे वीजपुरवठाही खंडित झाला होता. झालेल्या नुकसानीची आमदार आशुतोष काळे यांनी बाधित गावांना भेट देत झालेल्या नुकसानीची प्रत्यक्ष पाहणी केली व प्रशासनाकडून सुरू असलेल्या पंचनाम्यांचा आढावा घेतला.

शुक्रवार दि.२२ रोजी सायंकाळी सातच्या सुमारास अचानक विजांच्या कडकडाटासह मुसळधार पाऊस आणि वादळी वार्याने कोपरगाव मतदार संघातील अनेक गावात झालेल्या नुकसानीची आमदार आशुतोष काळे यांनी माहिती जाणून घेवून प्रशासनाला तातडीने पंचनामे करण्याच्या सूचना दिल्या होत्या. एवढ्यावरच न थांबता रविवार दि.२४ रोजी झालेल्या नुकसानीची पाहणी करण्यासाठी त्यांनी स्वत: मतदार संघातील नुकसानग्रस्त गावांना भेटी दिल्या. वादळामुळे अनेक घरांचे झालेले नुकसान, फळबागांसह, नर्सरी तसेच झाडे उन्मळून पडल्यामुळे जनावरांच्या गोठ्यांचे तसेच इतर मालमत्तेच्या झालेल्या नुकसानीची त्यांनी प्रत्यक्ष पाहणी करून नागरिकांशी संवाद साधला.

यावेळी त्यांनी प्रशासकीय अधिकार्यांशी भ्रमणध्वनीवरून संपर्क साधत नायब तहसीलदार सौ.प्रफुल्लिता सातपुते तसेच तालुका कृषी अधिकारी मनोज सोनवणे यांच्याकडून नुकसान ग्रस्तांच्या पंचनाम्याबाबतची माहीती जाणून घेतली. मतदार संघातील ज्या गावात नुकसान झाले आहे त्या सर्व नुकसानीचे वेळत पंचनामे पूर्ण करून शासनाकडे त्वरित अहवाल सादर करा व पंचनामे करतांना एकही नुकसानग्रस्त नागरीक मदतीपासून वंचित राहणार नाही यासाठी काळजी घ्या. यापूर्वीही नैसर्गिक संकटात महायुती शासनाकडे केलेल्या पाठ्पुराव्यातून नुकसानग्रस्तांना समाधानकारक नुकसानभरपाई मिळवून दिली आहे. त्याप्रमाणे याहीवेळेस झालेल्या नुकसानीची मदत मिळवून देण्यासाठी नेहमीप्रमाणे पाठपुरावा करून महायुती शासनाकडून जास्तीत जास्त मदत मिळवून देण्यासाठी आवश्यक कार्यवाही गतीने पूर्ण करण्याचे निर्देश त्यांनी प्रशासनाला दिले.

अवकाळी पाऊस आणि वादळी वार्यामुळे अनेक नागरिकांचे मोठे आर्थिक नुकसान झाले असून अशा कठीण प्रसंगी शासन व प्रशासन नागरिकांच्या पाठीशी खंबीरपणे उभे आहे तुम्ही चिंता करू नका अशी ग्वाही देवून नुकसानग्रस्तांना योग्य ती मदत मिळवून देण्यासाठी आपण कटिबद्ध असल्याचे आमदार आशुतोष काळे यांनी यावेळी सांगितले.

## केडगाव स्पोर्ट्स अकॅडमीच्या बास्केटबॉल लीगला उत्स्फूर्त प्रतिसाद

### १४ वर्षाखालील मुला-मुलींनी दाखवली दमदार खेळीऊर्जा गुरुकुल स्कूलमध्ये रंगली स्पर्धा

**● अहिल्यानगर । वीरभूमी–**

केडगाव स्पोर्ट्स अकॅडमीच्या वतीने आयोजित १४ वर्षाखालील मुला-मुलींची बास्केटबॉल लीग स्पर्धा ऊर्जा गुरुकुल स्कूल, केडगाव येथे मोठ्या उत्साहात संपन्न झाली. जिल्ह्यातील उदयोन्मुख खेळाडूंना व्यासपीठ उपलब्ध करून देण्याच्या उद्देशाने आयोजित करण्यात आलेल्या या स्पर्धेला खेळाडू, पालक आणि क्रीडाप्रेमींचा उत्स्फूर्त प्रतिसाद लाभला.

केडगाव स्पोर्ट्स अकॅडमीचे अध्यक्ष बाबासाहेब कोतकर यांच्या मार्गदर्शनाखाली तसेच प्रशिक्षक छबुराव कोतकर आणि सौ. स्वाती बाराहाते यांच्या नियोजनातून या स्पर्धेचे यशस्वी आयोजन करण्यात आले. स्पर्धेदरम्यान खेळाडूंनी उत्कृष्ट सांघिक खेळ, चपळ हालचाली आणि क्रीडाभावनेचे दर्शन घडवत उपस्थितांची मने जिंकली.

या स्पर्धेसाठी सचिन अग्रवाल, ओमसिंग बायस, मार्शल सर, हर्षल शेलोत, ऊर्जा गुरुकुलच्या संचालिका कल्याणी फिरोदिया, ज्ञानसाधना गुरुकुल क्लासेसचे प्रसाद जमदाडे, प्रसाद आंधळे यांच्यासह अनेक मान्यवर उपस्थित होते. मान्यवरांच्या हस्ते विजेत्या संघांना पारितोषिके व सन्मानचिन्ह देऊन गौरविण्यात आले.

यावेळी बोलताना अकॅडमीचे प्रशिक्षक छबुराव कोतकर म्हणाले की, शहरी भागातील मुला-मुलींमध्ये बास्केटबॉलसारख्या खेळाची आवड निर्माण व्हावी आणि त्यांना दर्जेदार प्रशिक्षण मिळावे, हा या स्पर्धेमागील मुख्य उद्देश आहे. खेळाडूंचा उत्साह आणि पालकांचा प्रतिसाद पाहता भविष्यात आणखी मोठ्या स्तरावर स्पर्धा आयोजित करण्याची प्रेरणा मिळाली आहे.

स्पर्धेदरम्यान पालकांनीही अकॅडमीच्या उपक्रमाचे कौतुक करत अशा क्रीडा स्पर्धा सातत्याने





व्हाव्यात, अशी अपेक्षा व्यक्त केली. स्पर्धेच्या यशस्वी आयोजनासाठी स्वयंसेवकांचे सर्व सहकारी, प्रशिक्षक आणि केडगाव स्पोर्ट्स अकॅडमीच्या वतीने आभार मानण्यात आले.

# मुख्यमंत्री समृद्ध पंचायत राज अभियानात रेनवडी अव्वल

### जिल्हास्तरीय स्पर्धेसाठी गावात उत्साहाचे वातावरण । जोरदार तयारीला प्रारंभ

**● पारनेर । वीरभूमी –**

महाराष्ट्र शासनाच्या ग्रामविकास व पंचायत राज विभागाच्या वतीने राबविण्यात येणार्या 'मुख्यमंत्री समृद्ध पंचायत राज अभियान' अंतर्गत पारनेर तालुक्यातील रेनवडी ग्रामपंचायतीने तालुकास्तरीय तपासणी व मूल्यमापन स्पर्धेत प्रथम क्रमांक पटकावला आहे. जिल्हा परिषद अहिल्यानगर आणि पंचायत समिती पारनेर यांच्या मार्गदर्शनाखाली पार पडलेल्या या अभियानात रेनवडी ग्रामपंचायतीने आदर्श व सातत्यपूर्ण कामकाजाच्या जोरावर गावाच्या शिरपेचात मानाचा तुरा रोवला आहे.

या स्पर्धेत पारनेर तालुक्यातील एकूण २३ ग्रामपंचायतींनी सहभाग नोंदविला होता. मागील महिन्यात हिंगोली जिल्ह्यातील औंढा पंचायत समितीच्या तपासणी व मूल्यमापन समितीने रेनवडी गावाला भेट देऊन विविध कामांची पाहणी केली होती. अभियानातील आठ प्रमुख घटकांवर रेनवडी ग्रामपंचायतीने नियोजनबद्ध आणि लोकसहभागातून प्रभावी कामकाज केल्यामुळे गावाला प्रथम क्रमांक मिळाला.

हे यश एखाद्या व्यक्तीचे नसून संपूर्ण गावाच्या एकोप्याचे, लोकसहभागाचे आणि श्रमदानाचे फलित असल्याची भावना ग्रामस्थांनी व्यक्त केली.

या यशामध्ये ग्रामपंचायत अधिकारी हरिश्चंद्र काळे यांचे मार्गदर्शन महत्त्वपूर्ण ठरले. त्यांनी गावातील विविध घटकांना एकत्रित करत सर्व शासकीय विभागांच्या कर्मचार्यांना अभियानात सहभागी करून घेतले. ग्रामपंचायत कर्मचारी, शिक्षण व आरोग्य विभाग, अंगणवाडी सेविका तसेच महिला बचत गटांनीही परिश्रमपूर्वक योगदान दिले.

तसेच आजी-माजी लोकप्रतिनिधी, विविध संस्थांचे पदाधिकारी, तंटामुक्ती समिती, युवक मंडळे, मुंबईकर-पुणेकर मंडळ आणि समस्त ग्रामस्थांच्या सहकार्यामुळे हे यश शक्य झाल्याची भावना व्यक्त करण्यात आली.

रेनवडी गावात या यशाचा आनंद पेढे वाटून उत्साहात साजरा करण्यात आला. गावचे आराध्य दैवत श्री दक्षिणमुखी हनुमान मंदिरात पूजा-अर्चा करून जिल्हास्तरीय स्पर्धेच्या तयारीचा शुभारंभ करण्यात आला.

अभियानाच्या कालावधीत जिल्हा परिषदेचे मुख्य कार्यकारी अधिकारी आनंद भंडारी, उपमुख्य कार्यकारी अधिकारी (ग्रामपंचायत) दादाभाऊ गुंजाळ, गटविकास अधिकारी दिलीप सोनकुसळे आणि सहाय्यक गटविकास अधिकारी दयानंद पवार यांनी केलेल्या मार्गदर्शनाबद्दल ग्रामस्थांनी प्रशासनाचे आभार मानले.

तालुकास्तरावरील यशानंतर आता जिल्हास्तरीय स्पर्धेतही रेनवडीचा नावलौकिक



कायम राखण्यासाठी ग्रामस्थ आणि विविध संस्थांनी एकजुटीने काम करण्याचा निर्धार करत जोरदार तयारी सुरू केली आहे.

# तरुणांनी मोठ्या संख्येने साहित्याकडे यावे

## योगेश सोमण । राज्यस्तरीय शब्दगंध साहित्य संमेलनाची उत्साहात सांगता

**● अहिल्यानगर । वीरभूमी –**

शब्दगंध साहित्य परिषदेच्या वतीने आयोजित करण्यात आलेल्या १७ व्या राज्यस्तरीय शब्दगंध साहित्य संमेलनाची स्व. अरुणकाका साहित्य नगरीत उत्साहपूर्ण वातावरणात सांगता झाली. विविध साहित्यिक उपक्रम, चर्चासत्रे, 'असा मी घडलो' सत्र, पारितोषिक वितरण आणि समारोप सोहळ्याने संमेलनाचा शेवट संस्मरणीय ठरला.

समारोप कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी अखिल भारतीय मराठी साहित्य महामंडळाचे अध्यक्ष योगेश सोमण होते. यावेळी स्वागताध्यक्ष सुरेश बनसोडे, संमेलनाध्यक्ष प्रा. संदीप सांगळे, आयएएस अधिकारी गुलाबराव खरात, वरिष्ठ तुरुंग अधिकारी रेवनाथ कानडे, प्राचार्य डॉ. सुरेश पठारे, डॉ. सचिन पांडुळे, रमेश वाघमारे, हर्षल आगळे, शिवाजीराव देवढे, बापूसाहेब भोसले, राजेंद्र उदागे, ज्ञानदेव पांडुळे, सुनील गोसावी, अशोक कानडे, भगवान राऊत, भारत गाडेकर, तुकाराम गोंदकर, जयश्री झरेकर, डॉ. अनिल गर्जे, स्वाती ढोबळे, बबनराव गिरी, सुभाष सोनवणे, शर्मिला गोसावी, राजेंद्र पवार, रवींद्र



दानापुरे, प्रशांत सूर्यवंशी, राजेंद्र चोबे, गिरीश जाधव, हरिभाऊ नजन, राजेंद्र फंड, मकरंद घोडके आदी मान्यवर उपस्थित होते.

कार्यक्रमाची सुरुवात शाहीर भारत गाडेकर यांच्या माणसाला वंदन गीताने झाली. त्यानंतर सुनील गोसावी यांनी प्रस्ताविकातून संमेलनाच्या वाटचालीचा आढावा घेतला. अध्यक्ष योगेश सोमण आणि स्वागताध्यक्ष सुरेश बनसोडे यांच्या हस्ते विविध क्षेत्रातील मान्यवरांचा गौरव करण्यात आला. तसेच शब्दगंध साहित्य परिषदेच्या वतीने स्वागताध्यक्ष सुरेश बनसोडे यांचा सहपत्नीक सत्कार करण्यात आला.

अध्यक्षीय भाषणात योगेश सोमण यांनी आजच्या बदलत्या सामाजिक परिस्थितीवर भाष्य करताना सांगितले की, एका कुटुंबात जेवताना प्रत्येकाच्या हातात मोबाईल असतो; मात्र संवाद हरवत चालला आहे. साहित्य संमेलन हे फक्त कट्ट्यासारखे न राहता जिवंत संवाद निर्माण करणारे व्यासपीठ झाले पाहिजे.

ते पुढे म्हणाले की, कवी आणि साहित्यिकांनी लोकांसमोर येऊन सादरीकरण करावे. साहित्यामध्ये आलेली मरगळ त्यामुळे दूर होईल. पुण्यात होणाऱ्या १०० व्या साहित्य संमेलनात युवक मोठ्या प्रमाणात सहभागी होतील, यासाठी आम्ही प्रयत्नशील आहोत. लेखणीला मिळणारा प्रतिसाद पाहता भविष्यात शब्दगंध साहित्य संमेलनात युवकांची उपस्थिती मोठ्या प्रमाणात दिसेल.

स्वागताध्यक्ष सुरेश बनसोडे यांनी आपल्या मनोगतात सांगितले की, स्व. अरुणकाका जगताप यांच्या स्मरणार्थ आयोजित करण्यात येणारे शब्दगंध साहित्य संमेलन हे आमदार संग्राम जगताप यांच्या पुढाकारातून अविरतपणे पुढे चालू राहणार आहे. सूत्रसंचालन शर्मिला गोसावी आणि अशोक कानडे यांनी केले, तर ज्ञानदेव पांडुळे यांनी आभार मानले.

# SPOT NEWS

## जालिंदर बोरुडे शिर्डीत महाराष्ट्र गुणगौरव पुरस्काराने सन्मानित

**● अहिल्यानगर । वीरभूमी –**

सामाजिक कार्यकर्ते तथा 'नेत्रदूत' म्हणून ओळख असलेले जालिंदर बोरुडे यांना शिर्डी येथे बी दी चेंज फाउंडेशनच्या वतीने महाराष्ट्र गुणगौरव पुरस्कार २०२६ प्रदान करण्यात आला. नेत्र तपासणी, मोतीबिंदू शस्त्रक्रिया शिबिर आणि नेत्रदान या चळवळीत सक्रीय योगदान देऊन समाज परिवर्तनासाठी दिलेल्या उत्कृष्ट योगदानाबद्दल हा सन्मान बोरुडे यांना प्रदान करण्यात आला. साई पालखी निवारा सभागृहात झालेल्या पुरस्कार वितरण सोहळ्यात कॅप्टन संजय कुमार यांच्या हस्ते बोरुडे यांना पुरस्काराने सन्मानित करण्यात आले. यावेळी पोलीस निरीक्षक संदीप कोळी, नायब तहसीलदार प्रफुल्लता सातपुते, उद्योजक संजय वाबळे, अभिनेत्री निवेदिता पगार, महसूलचे सुरेश घोडके, फाऊंडेशनचे अध्यक्ष अभिषेक तुपे आदींसह सामाजिक क्षेत्रातील व्यक्ती मोठ्या संख्येने उपस्थित होते. कॅप्टन संजय कुमार म्हणाले की, जालिंदर बोरुडे सारख्या सेवाव्रतींच्या कार्यामुळे समाजाला दिशा मिळत आहे. त्यांनी गेल्या अनेक वर्षांपासून निस्वार्थ भावनेने नेत्रसेवा करत हजारो लोकांना नवजीवन दिले आहे. फिनिक्स सोशल फाउंडेशनच्या माध्यमातून त्यांनी केलेले कार्य हे खऱ्या अर्थाने गरजूंना नवसंजीवनी ठरत आहे. लाखो व्यक्तींचे नेत्रदोष दूर करुन त्यांनी गरजूंना आधार दिला असल्याचे ते म्हणाले. तसेच पोलीस निरीक्षक संदीप कोळी व नायब तहसीलदार प्रफुल्लता सातपुते यांनी आपल्या मनोगतामध्ये फिनिक्स फाऊंडेशनच्या सामाजिक कार्याचे कौतुक केले. जालिंदर बोरुडे यांनी फिनिक्स सोशल फाउंडेशनच्या माध्यमातून गेल्या तब्बल ३४ वर्षांपासून सातत्याने नेत्रसेवा कार्य सुरू ठेवले आहे. त्यांनी स्वखर्चाने विविध शिबिरे आयोजित करून हजारो गरजू आणि नेत्रदोष असलेल्या रुग्णांची मोफत मोतिबिंदू शस्त्रक्रिया करून त्यांना नवदृष्टी दिली आहे. याशिवाय त्यांनी नागरिकांमध्ये मरणोत्तर नेत्रदानाची जागृती करून अनेकांकडून नेत्रदान घडवून आणले आहे. फाउंडेशनच्या माध्यमातून अवयवदान जनजागृतीसह विविध सामाजिक उपक्रमही सातत्याने राबविले जात आहेत. त्यांच्या या उल्लेखनीय कार्याची दखल घेत त्यांना बी दी चेंज फाउंडेशनच्या वतीने महाराष्ट्र गुणगौरव पुरस्कार २०२६ प्रदान करण्यात आला. हा पुरस्कार मिळाल्याबद्दल त्यांचे अभिनंदन होत आहे.

## सीना नदी पात्र पाहणी झाली, पण प्रश्न सुटला नाही : किरण काळे

**● अहिल्यानगर । वीरभूमी –**

सीना नदीच्या पूररेषेमुळे निर्माण झालेल्या समस्यां बाबत शिवसेना उद्धव बाळासाहेब ठाकरे पक्षाचे महानगर प्रमुख किरण काळे यांनी बाधित नागरिकांना दिलासा मिळवून देण्यासाठी ठाकरे शिवसेना शासन स्तरावर पाठपुरावा करणार असल्याचे म्हटले आहे. प्रशासन, शासनाच्या गंभीर चुकी मुळे हजारो नगरकर त्रस्त आहेत. सीना नदी पात्राची आजवर अनेक वेळा पाहणी झाली, बैठका झाल्या. पण प्रश्न काही सुटला नाही. आता बाधितांच्या संयमाचा अंत पाहू नका. अन्यथा ठाकरे शिवसेना आक्रमक पवित्रा घेईल, असा इशारा काळे यांनी दिला आहे. काळे म्हणाले की, सीना नदी आणि संबंधित नाल्यांच्या पूरनियंत्रण रेषांमुळे शहरातील हजारो जमीनधारक, प्लॉटधारक आणि नागरिक अडचणीत आले आहेत. चुकीच्या पद्धतीने आखण्यात आलेल्या पूररेषेमुळे अनेक भागातील बांधकामयोग्य क्षेत्र प्रभावित झाले असून नागरिकांना मोठ्या आर्थिक अडचणींचा सामना करावा लागत आहे. अनेक कुटुंबांनी आयुष्यभराची जमा-पूंजी खर्च करून प्लॉट खरेदी केले, मात्र आता त्या जागेवर बांधकाम करता येत नसल्याने त्यांच्या स्वप्नांवर पाणी फिरण्याची परिस्थिती निर्माण झाली आहे. किरण काळे म्हणाले, या प्रश्नामुळे शहराच्या विकासालाही मोठा फटका बसत आहे. हजारो प्लॉटधारक आणि व्यावसायिकांमध्ये अनिश्चिततेचे वातावरण निर्माण झाले असून या विषयाचा सर्वंकष अभ्यास करून पूररेषेचा पुनर्विचार होणे आवश्यक आहे. यापूर्वी लोकप्रतिनिधींच्या पुढाकारातून काही बैठका पार पडल्या होत्या. खात्याचे मंत्री, अधिकाऱ्यां समक्ष प्रत्यक्ष नदीपात्राची पाहणी करत नुसते फोटोसेशन करण्यात आले. मात्र प्रत्यक्षात प्रश्न सुटला नाही. आता बाधितांचा अंत पाहू नये. वेळ प्रसंगी ठाकरे शिवसेना आक्रमक भूमिका घेईल, असा इशारा काळे यांनी दिला आहे. बाधित नागरिकांना आवाहन करताना काळे यांनी सांगितले की, या परिस्थितीत कोणत्याही नागरिकाने निराश होऊ नये. प्रभावित नागरिकांच्या न्याय्य हक्कांसाठी ठाकरे शिवसेना तुमच्या पाठीशी ठामपणे उभी आहे. हा केवळ काही व्यक्तींचा प्रश्न नसून हजारो कुटुंबांच्या भविष्याशी संबंधित विषय आहे. किरण काळे म्हणाले, यापुढे शासन, प्रशासन आणि संबंधित विभागांकडे या प्रश्नाच्या सोडवणुकीसाठी ठाकरे शिवसेनेकडून सातत्याने पाठपुरावा करण्यात येईल. बाधितांना न्याय मिळावा, पूररेषेचा पुनर्विचार व्हावा आणि सर्वांना दिलासा देणारा मार्ग काढावा यासाठी सर्व स्तरावर प्रयत्न केले जातील, असे काळे यांनी म्हटले आहे.

## शिक्षकांसाठी कॅशलेस आरोग्य योजनेचा मार्ग मोकळा

### प्रसाद शिंदे यांच्या पाठपुराव्याला यश

**● अहिल्यानगर । वीरभूमी–**

राज्यातील सर्व जिल्हा परिषद व खाजगी १०० टक्के अनुदानित शाळांमधील शिक्षक व शिक्षकेत्तर कर्मचाऱ्यांना आयुष्यमान भारत प्रधानमंत्री जन आरोग्य योजना व विस्तारित महात्मा फुले जन आरोग्य योजनेंतर्गत कॅशलेस वैद्यकीय सुविधा उपलब्ध करून देण्याबाबत शिक्षक नेते प्रसाद शिंदे यांनी केलेल्या सातत्यपूर्ण पाठपुराव्याला यश आले आहे.



नुकत्याच निर्गमित झालेल्या पत्रानुसार संबंधित प्रस्ताव सार्वजनिक आरोग्य विभागाकडे सादर करण्यात आला असून आयुष्यमान भारत प्रधानमंत्री जन आरोग्य योजना व विस्तारित महात्मा फुले जन आरोग्य योजनेंतर्गत प्रति कुटुंब प्रति वर्ष पाच लाख रुपयांपर्यंत आरोग्य संरक्षणाचा लाभ देण्यात येणार असल्याचे स्पष्ट करण्यात आले आहे. या लाभार्थ्यांमध्ये शिक्षक व शिक्षकेत्तर कर्मचाऱ्यांचाही समावेश असल्याचे नमूद करण्यात आले आहे.

शिक्षक नेते प्रसाद शिंदे यांनी राज्याचे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांना निवेदन देऊन राज्यातील सर्व शिक्षक व शिक्षकेत्तर कर्मचाऱ्यांचा आयुष्यमान भारत प्रधानमंत्री जन आरोग्य योजनेमध्ये समावेश करावा, अशी मागणी केली होती. त्यानंतर अहिल्यानगर जिल्ह्यातील दिवंगत आमदार शिवाजीराव कर्डिले व शिक्षक आमदार किशोर दराडे, आमदार संग्राम जगताप, पदवीधर आमदार सत्यजित तांबे, आमदार विठ्ठलराव लंघे, आमदार किरण लहामटे, आमदार विक्रम पाचपुते तसेच आमदार काशिनाथ दाते यांची भेट घेऊन मुख्यमंत्री कार्यालयाकडे पाठपुरावा करण्यात आला.

या योजनेचा लाभ घेण्यासाठी सर्व शिक्षक व शिक्षकेत्तर कर्मचाऱ्यांनी आभा कार्ड काढणे आवश्यक असल्याचे सांगण्यात आले आहे. तसेच यापुढे पाच लाख रुपयांपर्यंतच्या वैद्यकीय प्रतिपूर्तीचे देयक स्वीकारले जाणार नसल्याने सर्वांनी तातडीने आभा कार्ड काढावे, असे आवाहन करण्यात आले आहे.

याबाबत प्रसाद शिंदे म्हणाले की, शिक्षक आजारी असताना त्यांच्या कुटुंबाला आर्थिक अडचणींना सामोरे जावे लागते. कॅशलेस आरोग्य योजनेमुळे शिक्षक व शिक्षकेत्तर कर्मचाऱ्यांना मोठा दिलासा मिळणार असून ही योजना सर्वांसाठी अत्यंत उपयुक्त ठरणार आहे. याप्रसंगी शिंदे यांनी सर्व अहिल्यानगर जिल्ह्यातील लोकप्रतिनिधींचे शिक्षकांच्या वतीने आभार मानले आहेत.

## पारनेर शहरात वाढत्या उन्हामुळे लाहीलाही; चौकाचौकात पाणपोई सुरू करण्याची नागरिकांची मागणी

**● पारनेर । वीरभूमी –**

मे महिन्याच्या सुरुवातीपासूनच पारनेर शहर व परिसरात उन्हाचा पारा चांगलाच वाढला आहे. कडक उन्हामुळे नागरिकांच्या अंगाची लाहीलाही होत असून, दुपारच्या वेळी रस्ते ओस पडू लागले आहेत. या वाढत्या तापमानामुळे शरीरातील पाण्याचे प्रमाण कमी होऊन वारंवार तीव्र तहान लागत आहे. अशा परिस्थितीत कामानिमित्त बाहेर पडणाऱ्या नागरिकांना, प्रवाशांना आणि सर्वसामान्यांना पाण्यासाठी भटकंती करावी लागत आहे. हीच गैरसोय टाळण्यासाठी पारनेर शहरातील बसस्थानक चौक, हिंद चौक, हनुमान मंदिर चौक, तहसील कार्यालय परिसर,मुख्य बाजारपेठ आणि प्रमुख चौकाचौकात पिण्याच्या पाण्यासाठी तातडीने पाणपोई सुरू करण्याची अत्यंत आवश्यकता निर्माण झाली आहे.




यंदा उन्हाची तीव्रता एवढी जास्त आहे की, घरातून बाहेर पडताच अवघ्या काही मिनिटांत गळा सुकू लागतो. वैद्यकीय तज्ज्ञांच्या मते, उन्हाळ्यात शरीरातील पाण्याचे प्रमाण कमी झाल्यास उष्माघात चक्कर येणे किंवा डिहायड्रेशनचा मोठा धोका असतो. त्यामुळे या दिवसांत वारंवार पाणी पिण्याशिवाय दुसरा कोणताही पर्याय नसतो. अशा वेळी रस्त्यावरून चालणाऱ्या प्रवाशांना किंवा मजुरांना विकतचे पाणी घेणे प्रत्येक वेळी परवडणारे नसते.

पारनेर शहरात कामानिमित्त ग्रामीण भागातून येणाऱ्या नागरिकांची संख्या मोठी आहे. एसटी स्टँड परिसर, मुख्य बाजारपेठ, सुपा रोड आणि शासकीय कार्यालयांचे चौक या ठिकाणी लोकांची सतत वर्दळ असते. या भागात तहानलेल्या कंठाला तृप्त करण्यासाठी पाणपोईची व्यवस्था असणे ही काळाची गरज बनली आहे. अन्नदान हे श्रेष्ठ दान मानले जाते, परंतु या कडक उन्हात तहानलेल्या जीवाला पाणी देणे हे त्याहूनही मोठे पुण्यकर्म आहे.

याच सामाजिक भावनेतून पारनेर शहरातील दानशूर व्यक्ती, सामाजिक संस्था, तरुण मंडळे आणि व्यापारी बांधवांनी पुढे येण्याची गरज आहे. आपल्या भागातील प्रमुख चौकांमध्ये मातीचे रांजण किंवा पाण्याचे जार ठेवून पाणपोईची व्यवस्था करावी, असे आवाहन सुजाण नागरिकांमधून केले जात आहे. प्रशासनानेही यासाठी पुढाकार घेऊन सार्वजनिक ठिकाणी पाण्याच्या सुविधेला प्राधान्य द्यावे, जेणेकरून या कडक उन्हात सर्वसामान्यांना मोठा दिलासा मिळेल.

## भगवंताची भक्ती अमर्यादित असेल तर जीवनाला खरे सार्थक

### ह.भ.प. बाळासाहेब महाराज रंजाळे । रामवाडी येथे संत तुकाराम महाराज गाथा पारायण व कीर्तन महोत्सवाचे आयोजन

**● कोपरगाव । वीरभूमी–**

अंत:करणापासून भगवंताला साद घातली तर तो भक्ताच्या सर्व इच्छा पूर्ण करतो. भगवंतावर अमर्यादित भक्ती करणारा मनुष्यच खरा भाग्यवंत असतो, असे प्रतिपादन ह.भ.प. बाळासाहेब महाराज रंजाळे यांनी केले.

तालुक्यातील रामवाडी येथे आयोजित संत तुकाराम महाराज गाथा पारायण व कीर्तन महोत्सवात द्वितीय पुष्प गुंफताना ते बोलत होते.

जगद्गुरू संत तुकाराम महाराजांच्या भाग्यवंत म्हणो तया, शरण गेले पंढरीराया या अभंगाचे निरूपण करताना रंजाळे महाराज म्हणाले की, या मृत्युलोकात जे भगवंताला शरण गेले तेच खरे भाग्यवंत आहेत. ते मागेही तरले आहेत आणि पुढेही तरतील, असा दृढ विश्वास आहे.

'भाग्य' या शब्दाला 'वान' आणि 'वंत' असे दोन प्रत्यय लागतात. एखादी गोष्ट मर्यादित असेल तर तेथे 'वान' हा प्रत्यय लागतो, तर अमर्यादित असेल तर 'वंत' हा प्रत्यय वापरला जातो. एखाद्याकडे मर्यादित धन असेल तर त्याला 'धनवान' म्हणतात, तर अमर्यादित धन असेल तर तो 'धनवंत' ठरतो. त्याचप्रमाणे मर्यादित गुण असतील तर 'गुणवान' आणि अमर्यादित गुण असतील तर 'गुणवंत' असे संबोधले जाते. तसेच मर्यादित भाग्य असलेला 'भाग्यवान' तर अमर्यादित भाग्य लाभलेला 'भाग्यवंत' असतो, असे त्यांनी उदाहरणांसह स्पष्ट केले.

भाग्यवंतांचे कर्म, योग, मोक्ष आणि भक्ती असे चार प्रकार असल्याचेही त्यांनी यावेळी सांगितले.

यावेळी संगीत अलंकार अरुण म. पगारे, संदीप म. वैद्य, रोहित महाराज, अनिल महाराज, ह.भ.प. भाकरे महाराज, धोंडीराम तपकीरे, वाल्मीक महाराज, पावडे महाराज आदींनी संगीत साथ दिली.

पंचक्रोशीतील वारी, कान्हेगाव, भोजडे, संवत्सर, लोकी, कोकणठाण, धोत्रे आदी गावांमधून मोठ्या




संख्येने भाविक उपस्थित होते. कार्यक्रमानंतर महाप्रसादाचे वाटप करण्यात आले. तसेच संपूर्ण नियोजनासाठी रामवाडी येथील तरुण मित्र मंडळ व स्वयंसेवक अथक परिश्रम घेत आहेत.

## चार मुलींनी साजरा केला माजी प्राचार्य मुरलीधर बारेकर यांचा सहस्त्र चंद्रदर्शन सोहळा

**● अकोले । वीरभूमी–**

मुलगाच हवा अशी मानसिकता अजूनही समाजात पाहायला मिळते. मात्र माझ्या मुलीच माझा खरा आधार आहेत असा विचार जपणारे माजी प्राचार्य मुरलीधर उर्फ अण्णा बारेकर यांच्या सहस्त्र चंद्रदर्शन सोहळ्याचा भावनिक आणि प्रेरणादायी कार्यक्रम नुकताच पार पडला. त्यांच्या चारही मुलींनी एकत्र येत हा सोहळा मातोश्री लॉन्स वर मोठ्या उत्साहात साजरा केला.

सत्यनिकेतन संस्थेच्या सर्वोदय विद्या मंदिरचे माजी प्राचार्य म्हणून सेवानिवृत्त झालेले मुरलीधर बारेकर यांनी आयुष्याची ८२ वर्षे पूर्ण केली आहेत. नियमित प्राणायाम, व्यायाम, फिरणे आणि संतुलित आहार यामुळे आजही त्यांची प्रकृती उत्तम आहे. त्यांच्या सहचारिणी पुष्पा बारेकर उर्फ नानी यांच्या साथीने अण्णांचे आयुष्य आजही अनेकांसाठी प्रेरणादायी ठरत आहे.

अण्णांना सुनीता गाडेकर, संगीता मांडवेकर, सोनाली भालेकर आणि स्वाती भालेकर या चार पदवीधर मुली आहेत. आपल्या आई-वडिलांवर जीवापाड प्रेम करणाऱ्या या चारही मुलींनी आपल्या कुटुंबासह अण्णा-नानींचा सहस्त्र चंद्रदर्शन सोहळा साजरा केला. जावई ज्ञानेश्वर, विठ्ठल, विवेक, संजय तसेच नातजावई विभव कशाळकर यांनीही अण्णा-नानींना आई-वडिलांप्रमाणे मान दिला आहे. त्यामुळे मुलगा नसल्याची खंत त्यांना कधीच वाटली नाही.

काही वर्षांपूर्वी मोठ्या आजारातून मुरलीधर बारेकर आत्मविश्वासाने बाहेर पडले. त्या कठीण काळात मुलींनी त्यांना मोठा मानसिक आधार देत उपचारासाठी साथ दिली. त्यातून ते पूर्णपणे बरे झाले. त्यानंतर मुलींनी आपल्या अण्णांचा वाढदिवस आणि सहस्त्र चंद्रदर्शन सोहळा विशेष पद्धतीने साजरा करण्याचा निर्णय घेतला.

यावेळी ८१ दिव्यांनी औक्षण करून मुलींनी आपल्या आई-वडिलांप्रती असलेले प्रेम व्यक्त केले. मुलींनी आपल्या भावना व्यक्त करताच उपस्थितांच्या डोळ्यांत अश्रू तरळले.

या कार्यक्रमाला माजी प्राचार्य ठकाजी कानवडे, मिलिंद उमराणी, नंदकिशोर बेल्हेकर, भारती महाले, विलास नवले, प्राचार्या मंजुषा काळे, विद्यार्थी, पालक व नातेवाईक मोठ्या संख्येने उपस्थित होते.

प्रसंगी बोलताना प्राचार्या मंजुषा काळे म्हणाल्या, आजचा हा क्षण केवळ सहस्त्र चंद्रदर्शन सोहळा नसून एका महान व्यक्तिमत्त्वाला दिलेला मानाचा मुजरा आहे. मुरलीधर बारेकर सर हे केवळ शिक्षक नाहीत, तर अनेकांच्या आयुष्याला दिशा देणारे दीपस्तंभ आहेत. त्यांच्या मोकळ्या, प्रेमळ आणि आपुलकीच्या स्वभावामुळे प्रत्येक जण त्यांना आपल्या कुटुंबातील सदस्य मानतो.

त्या पुढे म्हणाल्या, आजच्या काळात मुलगा-मुलगी असा भेद अजूनही दिसतो. मात्र 'माझ्या चार मुलीच माझ्या मुलाची उणीव भरून काढतील, त्याच माझ्या वंशाचा दिवा आहेत,' हा सरांचा विचार समाजासाठी आदर्श आहे. सत्यनिकेतन संस्था आणि



श्री स्वामी समर्थ संस्थेच्या पायाभरणीत जर कोणाचे निःस्वार्थ योगदान असेल, तर ते पायाचा भक्कम दगड म्हणजे बारेकर सर उर्फ आपले अण्णा होत. सूत्रसंचलन प्राचार्य किरण भागवत तर आभार सोनाली भालेकर हिने मानले

वीरभूमी
हे पत्रक मालक, मुद्रक व प्रकाशक– महादेव एकनाथ दळे यांनी आदिनाथ प्रिंटिंग प्रेस, कासार पिंपळगाव, ता. पाथर्डी, जि. अहिल्यानगर, ४१४५०५ येथे मुद्रित करून तिसगाव, ता. पाथर्डी, जि. अहिल्यानगर–४१४१०६ येथे प्रसिद्ध केले.
* संपादक– महादेव दळे, पत्ता– कासार पिंपळगाव, ता. पाथर्डी, जि. अहिल्यानगर मो. ९४२०८०२१४५ Email - mahadevdale@gmail.com वेबसाईट : www. veerbhuminews.com

# दक्षिण काशी पुणतांबाच्या विकासाला गती देणार

## सभापती प्रा.राम शिंदे । मा. आ. स्नेहलताताई कोल्हे आणि आ. विवेक कोल्हे यांचा पाठपुरावा ठरणार मोलाचा

**● कोपरगाव । वीरभूमी –**

पुणतांबा या पौराणिक महत्त्व असलेल्या गावाला दक्षिण काशी म्हणून ओळखतात. या तीर्थक्षेत्राचा ब दर्जा मिळून येणार आहे. त्याचबरोबर अहिल्यादेवी होळकर यांनी बांधलेल्या होळकर घाटाचं जतन आणि संवर्धन करण्यासाठी ग्रामविकासच्या माध्यमातून पाच कोटी रुपये पर्यंत निधीही उपलब्ध करून देण्यास स्वतः प्रयत्न करणार आहे.यासाठी मा.आ. स्नेहलताताई कोल्हे यांचा सातत्याने पाठपुरावा असतो आणि आता आमदार विवेक कोल्हे यांचाही पाठपुरावा असणार आहे त्यामुळे अधिक प्रभावीपणे पुणतांबा तीर्थक्षेत्राचा विकास होईल असा विश्वास विधान परिषदेचे सभापती प्रा. राम शिंदे यांनी व्यक्त केला आहे.

श्री क्षेत्र पुणतांबा या तीर्थक्षेत्र असलेल्या या गावाला राजा यज्ञसेनची नगरी म्हणून ओळखले जाते. कार्तिक स्वामी,बारा ज्योतिर्लिंग तसेच याज्ञसेनी देवी, मुदगलेश्वर, विठ्ठल मंदिर, शैव पंथीय समाधी, चांगदेव महाराज मंदिर परिसर तसेच या गावातील वेशी आणि इतरही जवळपास १७१ मंदिरांचे जतन आणि संवर्धनासाठी प्रयत्नशील असल्याचे सांगितले.

कोपरगाव विधानसभा मतदारसंघाच्या प्रथम महिला आमदार यांनी पौराणिक महत्त्व असलेल्या पुणतांबा नगरीची अहिल्यादेवी यांनी बांधलेला होळकर घाट आणि या परिसरातील मंदिरांचा जतन संवर्धन आणि पुणतांबा परिसरातील घाट, मंदिरे इतरही विकास कामासाठी मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस तसेच संबंधित विभागाकडे सातत्याने पाठपुरावा सुरू केला आहे. याचाच एक भाग म्हणून विधान परिषदेचे सभापती प्रा. राम शिंदे यांनी कार्तिक स्वामी मंदिरात दर्शन घेऊन तेथे अहिल्यादेवी होळकर यांनी बांधलेल्या होळकर घाटाची पाहणी केली घाटाची झालेली दुरावस्था पाहून राम शिंदे यांनी याबाबत तातडीने संबंधित विभागाला सूचना देणार असल्याचे सांगितले.

स्नेहलताताई कोल्हे यांनी पुणतांबा तीर्थक्षेत्राचे महत्व विषद करून मंदिरे आणि पुरातन वास्तू यांचा जीर्णोध्दार पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी काशीच्या केलेल्या विकासाच्या धर्तीवर व्हावा यासाठी मागणी केली.पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर यांचे विचार व कार्य हे नव्या पिढीला आदर्शवत ठेवा म्हणून जपण्यासाठी पुणतांबा तीर्थक्षेत्राचा विकास व्हावा यासाठी मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस व सभापती प्रा. राम शिंदे यांनी केलेल्या मागणीकडे विशेष लक्ष द्यावे असा आग्रह धरला.

> राजा यज्ञसेनची नगरी म्हणून कथेनुसार पुणतांबा ओळखले जाते. ब्रिटीश गॅझेट १८८७ मधील नोंदी नुसार अहिल्यादेवी होळकर यांनी इ. स. १७६५ ते १७९५ दरम्यान पुणतांबा येथे घाट बांधला. दक्षिणकाशी म्हणून ओळख असलेल्या या परिसरात बारा ज्योतिर्लिंग आहे.
>
> – **सुशांत घोडके,** गोदातीर परिसर इतिहास संशोधन मंडळ




यावेळी मंदिर दुरुस्ती सेवा समिती, बजरंगदल पुणतांबाचे सर्व स्वयंसेवक, गंगाधर चौधरी, मधुकर सातव, सुभाषराव वहाडणे,भारतराव वहाडणे, सुधाकर जाधव, चंद्रकांत वाटेकर, सुशांत घोडके, अनिल नळे, संभाजी गमे, अशोकभाऊ पवार, ज्येष्ठ विश्लेषक माधव ओझा, शिरीष कुलकर्णी तसेच पदाधिकारी, नागरिक व सहकारी उपस्थित होते.

# नगर शहरात व्यावसायिकावर गोळीबार, धारदार शस्त्राने केले वार

**● अहिल्यानगर । वीरभूमी–**

सावेडी उपनगरातील पाईपलाईन रस्ता परिसरात रविवारी (२४ मे) सकाळी एका व्यावसायिकावर चार अनोळखी हल्लेखोरांनी हल्ला केल्याची घटना घडली. या हल्ल्यात व्यावसायिक चिरंजीव गाढवे (वय ३१, रा. गणेश चौक, बोल्हेगाव फाटा) हे जखमी झाले असून त्यांच्यावर जिल्हा शासकीय रूग्णालयात उपचार सुरू आहेत. दरम्यान, हल्लेखोरांनी पळून जाताना हवेत गोळीबार केल्याचे गाढवे यांचे म्हणणे असून पोलिसांना घटनास्थळी निकामी काडतूस आढळून आली आहे.याबाबत गाढवे यांनी दिलेल्या जबाबावरून तोफखाना पोलीस ठाण्यात गुन्हा नोंद करण्यात आला आहे. गाढवे यांची एमआयडीसी निंबळक बायपास परिसरात मनोहर इंजिनियरिंग नावाची कंपनी आहे. ते आपल्या मित्रासोबत रविवारी सकाळी चहा-नाश्त्यासाठी बाहेर गेले होते. सकाळी ८.४५ वाजण्याच्या सुमारास गाढवे व त्यांचे मित्र राजू काळे हे पाईपलाईन रस्त्यावरील तुळजा भवानी मंदिराशेजारी असलेल्या पुणेरी चहा या दुकानात गेले होते. गाढवे हे पाणी बाटली घेण्यासाठी काउंटरजवळ उभे असताना अचानक त्यांच्या पाठीमागून आलेल्या तीन ते चार अनोळखी इसमांनी त्यांच्यावर हल्ला केला. यातील एका हल्लेखोराने धारदार शस्त्राने गाढवे यांच्या पाठीवर वार केला.




अचानक झालेल्या हल्ल्यामुळे गाढवे घाबरून दुकानाच्या आतमध्ये पळाले. त्यानंतर सर्व हल्लेखोर दुकानात घुसले. त्यांच्या चेहर्यावर मास्क बांधलेले होते. हल्लेखोरांनी तु आमच्या पप्पू शेठचं, गौरव भाऊचं नाव गुन्ह्यात घेतो का? असे म्हणत धारदार शस्त्रे, लोखंडी वस्तू तसेच लाथाबुक्क्यांनी मारहाण केली. स्वतःचा बचाव करण्यासाठी गाढवे यांनी हॉटेलमधील टेबल संशयितांकडे फेकल्याचेही जबाबात नमूद करण्यात आले आहे. दरम्यान, गाढवे यांनी आरडाओरडा केल्याने परिसरातील नागरिक जमा होऊ लागले. त्यामुळे संशयितांनी घटनास्थळावरून पळ काढला.

पळताना त्यातील एका संशयिताने कमरेतील पिस्तूल काढून हवेत गोळीबार केला असल्याचेही जबाबात नमदू आहे. घटनेची माहिती मिळताच अप्पर पोलीस अधीक्षक वैभव कलुबर्मे, शहर उपअधीक्षक डॉ. दिलीप टिपरसे, निरीक्षक जगदीश भांबळ यांनी पथकासह घटनास्थळी भेट दिली. फॉरेन्सिक टिमला पाचारण करण्यात आले होते. घटनास्थळी निकामी झालेले काडतुस आढळून आले असून ते जप्त करण्यात आले आहे. निरीक्षक भांबळ अधिक तपास करीत आहेत.

# शिव पाणंदच्या प्रलंबित प्रकरणांसाठी १ व २ जूनला ‘चलो मंत्रालय’ आंदोलन : शरद पवळे

### राज्यभरातील पदाधिकारी मंत्रालयात सादर करणार निवेदने । पवळे

**● अहिल्यानगर । वीरभूमी–**

राज्यातील शेतरस्त्यांच्या प्रलंबित प्रश्नांवर न्याय मिळवण्यासाठी महाराष्ट्र राज्य शिव पाणंद शेतरस्ता चळवळीने १ व २ जून रोजी चलो मंत्रालयचा नारा दिला आहे. चळवळीचे प्रणेते शरद पवळे यांच्या नेतृत्वाखाली राज्यभरातील पदाधिकारी व शेतकरी मंत्रालयात जाऊन महसूल मंत्री चंद्रशेखर बावनकुळे तसेच संबंधित विभागांकडे पुराव्यासह निवेदने सादर करणार आहेत.



शिव पाणंद शेतरस्ता चळवळीच्या माध्यमातून ग्राम, तालुका, जिल्हा स्तरापासून मंत्रालयापर्यंत सातत्याने पाठपुरावा करून शेतरस्त्यांसंदर्भात विविध महत्त्वपूर्ण शासननिर्णय मंजूर करण्यात यश मिळाले आहे. मात्र, काही भागांमध्ये अधिकारी शासननिर्णयांची प्रभावी अंमलबजावणी करत असताना अनेक ठिकाणी त्याकडे दुर्लक्ष होत असल्याने शेतकऱ्यांना अजूनही हेलपाटे मारावे लागत असल्याचा आरोप पवळे यांनी केला आहे.

राज्यात शिव पाणंद प्रकरणांसाठी ‘झिरो पेंडन्सी अभियान’ राबवावे, तालुका, जिल्हा व मंत्रालय स्तरावर मासिक बैठकांचे आयोजन करावे, सर्व शेतरस्त्यांची नोंद घेऊन दगडी नंबरीद्वारे हद्द निश्चित करावी, तसेच सातत्याने सर्वेक्षण करून रस्त्यांचे मजबुतीकरण करावे, अशी मागणी चळवळीने केली आहे.

तसेच तहसील, प्रांत, जिल्हाधिकारी व आयुक्त कार्यालयांमध्ये प्रलंबित असलेली शेतरस्त्यांची प्रकरणे विशेष बाब म्हणून तातडीने निकाली काढावीत, शेतरस्त्याअभावी पडीत राहणाऱ्या जमिनींसाठी संबंधित जबाबदारांकडून नुकसानभरपाई द्यावी, क्षेत्रीय समित्यांमध्ये चळवळीच्या पदाधिकाऱ्यांना प्रतिनिधित्व द्यावे, तसेच सर्व कार्यालयांमधील अहवाल सार्वजनिकपणे प्रदर्शित करावेत, अशाही मागण्या करण्यात आल्या आहेत.

तहसीलदार कार्यालयातील अर्जांवर उत्तर देणे बंधनकारक करावे, प्रलंबित किंवा त्रुटी असलेले अर्ज तातडीने दुरुस्त करावेत, तहसीलदारांच्या आदेशांचे प्रांत व जिल्हाधिकारी स्तरावर अंतिम सर्वेक्षण करून अपील प्रक्रिया सुलभ करावी, तसेच न्यायालयीन प्रकरणे महसूल विभागाकडे वर्ग करून ‘फास्ट ट्रॅक’ पद्धतीने निकाली काढावीत, अशी मागणीही निवेदनात करण्यात आली आहे.

शिव पाणंद शेतरस्त्यांसाठी मंत्रालयासह तालुका व जिल्हा स्तरावर स्वतंत्र कक्ष स्थापन करण्याची मागणी करत राज्य सरकारने प्रशासकीय कार्यालयांतील शेतरस्त्यांच्या कामकाजाचा अहवाल जाहीर करावा, अशी अपेक्षाही शरद पवळे यांनी व्यक्त केली आहे.

# अहिल्यानगरमध्ये आणखी एका पतसंस्थेत ठेवीदारांचे कोट्यवधी अडकले; संचालक फरार

**● श्रीगोंदा । वीरभूमी –**

तालुक्यातील काष्टीसह इतर भागात शाखा आणि उपशाखा असलेल्या साईसेवा पतसंस्था आणि मल्टीस्टेटच्या ठेवी गुंतवणूकदारांना मिळत नसल्याने प्रशासकीय पातळीवर ठोस निर्णय होत नव्हता. सहा महिने संचालक मंडळाने वेगवेगळे आश्वासन देऊन वेळ मारून नेला, मात्र आता संस्थेचा अध्यक्ष परागंदा झाला असून बहुतांश संचालक फरार आहेत. त्यांचे मोबाईल नॉटरिचेबल आहेत. यातच काही ठेवीदाराच्या अर्जावर श्रीगोंदा न्यायालयाने या संस्थेच्या पदाधिकारी यांच्यावर गुन्हा दाखल करण्याचे आदेश दिलेले आहेत.

श्रीगोंदा तालुक्यात सिस्पे तसेच समर्थ क्रॉप या कंपन्यांनी हजारो कोटी रुपयाचा गंडा गुंतवणूकदारांना घातला त्याच पावलावर पाऊल टाकत सहकार क्षेत्रात राज्यस्तरीय आदर्श पुरस्कार प्राप्त साईसेवा पतसंस्थेचा अध्यक्ष, संचालक तसेच व्यवस्थापक यांनी संगनमताने ठेवीदारांचे पैसे आपल्या व्यवसाय, जमीन खरेदी, प्लॉट खरेदी, स्वीट कंपनी आणि राज्यातील प्रसिद्ध कथाकाराच्या कार्यक्रमाचे इव्हेंट आणि त्यांना आलिशान गाड्या देण्यासाठी केला असल्याचा आरोप ठेवीदार कृती समितीने केला आहे.

मागील एक वर्षापासून ठेवीदारांना पैसे परत मिळत नाहीत. या दरम्यान अध्यक्ष आणि व्यवस्थापक वेगवेगळी आश्वासन देत होते, मात्र पैसे देण्याचे टाळत होते. दरम्यान, ठेवीदार कृती समितीने पुणे येथील सहकार आयुक्त कार्यालयासमोर आंदोलन केले. मात्र सहकार विभाग ठोस पावले उचलत नाहीत. संस्थेचे लेखापरीक्षण यातही वेळकाढूपणा सुरू आहे. या सर्व प्रकारात ठेवीदार आक्रमक होत आहेत. काही ठेवीदार यांच्या श्रीगोंदा येथील न्यायालयीन दाव्यात ठेवीदारांचा पतसंस्था आणि मल्टीस्टेट दोन्हीचे संचालक चेअरमन यांच्या विरोधात गुन्हा दाखल करण्याचे आदेश पोलिसांना दिलेले आहेत. आता अध्यक्ष आणि बहुतांश संचालक फरार झाले आहेत. त्यांचे फोन नॉट रिचेबल आहेत.

# भीमथडी साहित्य संमेलनात पै. नाना डोंगरे यांचा विशेष सन्मान

**● अहिल्यानगर । वीरभूमी–**

ग्रामीण भागातील साहित्य चळवळीला चालना देत समाजप्रबोधनाचे कार्य सातत्याने करणारे सामाजिक कार्यकर्ते तथा ग्रामपंचायत सदस्य पै. नाना डोंगरे यांचा चौफुला केडगाव (ता. दौंड, जि. पुणे) येथे आयोजित राज्यस्तरीय भीमथडी साहित्य संमेलनात विशेष सन्मान करण्यात आला. त्यांच्या सामाजिक, सांस्कृतिक आणि साहित्य क्षेत्रातील उल्लेखनीय योगदानाची दखल घेत हा गौरव करण्यात आला.



दि. २३ व २४ मे रोजी दोन दिवस पार पडलेल्या या राज्यस्तरीय साहित्य संमेलनाचे उद्घाटन आमदार राहुल कुल यांच्या हस्ते उत्साहात झाले. यावेळी राष्ट्रीय समाज पक्षाचे राष्ट्रीय अध्यक्ष महादेव जानकर, ज्येष्ठ साहित्यिक फ. मु. शिंदे, संमेलनाचे मुख्य संयोजक दशरथ यादव यांच्यासह पै. डोंगरे यांना प्रमुख पाहुणे म्हणून आमंत्रित करण्यात आले होते. यावेळी साहित्य, संस्कृती आणि ग्रामीण जनजागृतीचा संगम घडवणाऱ्या या संमेलनात राज्यभरातील साहित्यिक, कवी, लेखक आणि सामाजिक कार्यकर्त्यांचा मोठा सहभाग होता.

पै. नाना डोंगरे यांनी ग्रामीण भागातील नवोदित साहित्यिक, कवी आणि सामाजिक कार्यकर्त्यांना व्यासपीठ उपलब्ध करून देण्यासाठी सातत्याने प्रयत्न केले आहेत. गावागावांत साहित्याची गोडी निर्माण व्हावी, ग्रामीण प्रतिभेला योग्य दिशा मिळावी आणि सामाजिक प्रश्नांवर जागृती व्हावी या उद्देशाने त्यांनी विविध साहित्यिक व सामाजिक उपक्रम राबविले आहेत. त्यांच्या कार्यामुळे ग्रामीण भागात सांस्कृतिक वातावरण निर्माण होण्यास मोठी मदत झाली आहे.

समाजप्रबोधनाच्या माध्यमातून त्यांनी स्त्री जन्माचे स्वागत, स्वच्छता अभियान, महिला सक्षमीकरण, मतदार जनजागृती, जलसंधारण अभियान, रक्तदान शिबिरे यांसारखे विविध सामाजिक उपक्रम प्रभावीपणे राबविले आहेत. युवकांमध्ये व्यसनमुक्तीबाबत जागरूकता निर्माण करण्यासाठी विविध कार्यक्रमांचे आयोजन करण्यात आले असून, गावपातळीवर आरोग्य शिबिरांच्या माध्यमातून ग्रामस्थांना आरोग्य सेवा उपलब्ध करून देण्याचे कार्यही त्यांनी सातत्याने सुरू ठेवले आहे.

ग्रामीण साहित्य चळवळीला बळ देण्यासाठी पै. डोंगरे यांनी आतापर्यंत आठ राज्यस्तरीय काव्य संमेलने तसेच सहा ग्रामीण मराठी साहित्य संमेलने यशस्वीपणे आयोजित केली आहेत. या माध्यमातून अनेक नवोदित कवी, लेखक आणि साहित्यिकांना आपली कला सादर करण्याची संधी मिळाली असून, ग्रामीण भागातील साहित्यिक प्रतिभेला नवे व्यासपीठ उपलब्ध झाले आहे. त्यांच्या या ग्रामीण साहित्य चळवळीला नवी ऊर्जा देणाऱ्या कार्याची दखल घेऊन त्यांचा यावेळी विशेष सन्मान करण्यात आला.

# २७ वर्षांनंतर एकत्र येत आठवणींना दिला उजाळा

## सेनापती बापट विद्यालयाच्या १९९९ बॅचच्या माजी विद्यार्थ्यांचा अनोखा स्नेहमेळावा उत्साहात

**● पारनेर । वीरभूमी–**

काळाच्या ओघात अनेक गोष्टी बदलतात, पण शालेय जीवनातील मैत्रीची वीण कधीच सैल होत नाही, याचा प्रत्यय पारनेर येथे आला. अहमदनगर एज्युकेशन सोसायटीच्या सेनापती बापट विद्यालयातील सन १९९९ च्या इयत्ता दहावीच्या बॅचचा स्नेहभेट सोहळा नुकताच उत्साहात पार पडला. तब्बल २७ वर्षांनंतर एकत्र आलेल्या या मित्रांनी जुन्या आठवणींना उजाळा देत, मैत्रीचा हा धागा सामाजिक बांधिलकीशी जोडण्याचा संकल्प केला.

कार्यक्रमाची सुरुवात विद्यालयाचे मुख्याध्यापक रावसाहेब कासार सर आणि माजी शिक्षक सुनील गायकवाड सर यांच्या प्रमुख उपस्थितीत झाली. सर्वांनी मिळून शाळेच्या प्रांगणातील क्रांतीवीर सेनापती बापट यांच्या पुतळ्यास पुष्पहार अर्पण करून अभिवादन केले.औपचारिकतेचे सर्व पडदे बाजूला ठेवून हे माजी विद्यार्थी २७ वर्षांपूर्वी ज्या 'दहावी ब' च्या वर्गात शिकत होते, त्याच वर्गात आणि त्याच बाकड्यांवर जाऊन बसले. या भावनिक क्षणाने अनेकांचे डोळे पाणावले. यानंतर झालेल्या परिचय सत्रात प्रत्येकाने आपण सध्या कुठे कार्यरत आहोत आणि उदरनिर्वाहाचे साधन काय आहे, याची माहिती दिली. व्यवसायाने आणि पदाने वेगवेगळे असले तरी शाळेच्या वर्गात मात्र सगळे पुन्हा एकदा 'फक्त मित्र' झाले होते. अंताक्षरी आणि गाण्याच्या भेंड्यांसारख्या मनोरंजक खेळांमुळे कार्यक्रमात कमालीची रंगत आली.

आजच्या धावपळीच्या आणि सोशल मीडियाच्या जगात शाळा सुटली की संपर्क तुटतो. पण २७ वर्षे एकत्र राहून या ग्रुपने मैत्रीचे एक वेगळेच उदाहरण समाजासमोर ठेवले आहे.

केवळ आनंद मिळवण्यासाठी एकत्र येण्यापेक्षा, या मैत्रीच्या ताकदीचा उपयोग समाजातील वंचित घटकांसाठी व्हावा. जुन्या मित्रांनी एकत्र येऊन गावातील गरीब विद्यार्थ्यांचे शिक्षण, वृक्षारोपण किंवा सामाजिक उपक्रमांना हातभार लावल्यास खऱ्या अर्थाने शिक्षणाचे आणि शाळेचे ऋण फिटेल,असा संदेश या स्नेहमेळाव्यातून देण्यात आला.

शाळा हे केवळ सुशिक्षित करण्याचे केंद्र नसून संस्कारांची शिदोरी असते. या माजी विद्यार्थ्यांनी आपल्या कृतीतून दाखवून दिले की, जेव्हा जुने मित्र एकत्र येतात, तेव्हा ती केवळ एक 'गेटटुगेदर' न राहता समाजाला दिशा देणारी एक मोठी शक्ती बनू शकते. शिक्षकांनीही या उपक्रमाचे कौतुक करत, हा स्नेह इतर पिढ्यांसाठीही प्रेरणादायी ठरेल असा विश्वास व्यक्त केला.

